सेशन केस नं. ७०/२०२३
निशाण नं. २५ /क

**अभियोगपक्षा तर्फे साक्षीदार क्र. १ यांची साक्ष शपथेवरुन सुरु**

माझे नाव - सुधाकर दिनकर पाटील

व.व. ४९ वर्षे व्यवसाय- शेती

रा. कोते ता. राधानगरी जि. कोल्हापूर

**अभियोगपक्षा तर्फे सरतपास वकिल श्रीमती एम.बी. पाटील , यांचेमार्फत सुरु**

मला तिन मुली असुन त्यांची नांवे वैष्णवी, वैभवी आणि स्वरा अशी आहेत. त्यातील वैष्णवी ही मयत आहे. सन २०२२ मध्ये वैष्णवी मध्ये भोगावती महाविदयालय कुरकली येथे बी. ए. च्या पहिल्या वर्षात शिकत होती. त्यावेळी तिचे वय १९ वर्ष होते. आरोपी शुभम शहाजी वीर याला मी ओळखतो. वैष्णवी हिचे आरोपी शुभम सोबत दोन वर्षापासु प्रेम संबंध होते. वैष्णवी मला मला म्हणत होती की ती त्याच्याशीच लग्न करणार आहे. म्हणुन मी दिनांक १७.०३.२०२२ रोजी खामकरवाडी गावा जवळ आरोपी शुभम याला भेटलो. आरोपीने मला सांगीतले की, तिचे आणि वैष्णवीचे प्रेम संबंध आहेत, तो तिच्याशी लग्न करणार आहे.

२. दिनांक २४.०३.२०२२ रोजी आरोपी शुभमचा वैष्णवीला फोन आला आणि त्याने तिला सांगीतले की, त्याच्या घरच्या लोकांचा त्याच्याशी तिचे लग्न करण्यास विरोध आहे त्यामुळे तो तिच्याशी लग्न करु शकत नाही. वैष्णवीने मला याबाबत सांगीतले. दिनांक २४.०३.२०२२ रोजी रात्री ९.०० वा. आम्ही घरातील सर्व जेवण करुन झोपलो. वैष्णवी आणि वैभवी एका खोलीत एका खोलीत झोपल्या. मी, माझी पत्नी आणि स्वरा एकत्र एका खोलीत झोपलो. दिनांक २५.०३.२०२२ रोजी १.४५ वा. वैभवीने मला उठविले आणि वैष्णवी उलटया करत असल्याचे सांगीतले. मी त्या रुम मध्ये जावुन काय झाले हे तिला विचारले. वैष्णवीने मला सांगीतले की तिने ग्रामोझोन हे औषध पिले. कारण शुभमने लग्न करण्यास तिला नकार

दिला.  मी सचिन बिद्रेकर यांच्या गाडीतुन वैष्णवीला सी.पी.आर हॉस्पीटल कोल्हापुर येथे नेले, माझी पत्नी सोबत होती.  सी.पी.आर हॉस्पीटल मध्ये वैष्णवीवर उपचार सुरु असतान वैष्णवीने पोलिसांना तिचा जबाब दिला.  तिने पोलिसांना सांगीतले की, आरोपी शुभमने लग्नास नकास दिल्यामुळे तिने ग्रामोझोन विषारी औषध पिले.  दिनांक २६.०३.२०२२ रोजी वैष्णवी मयत झाली.  तिचे प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले आणि तिचे प्रेत ताब्यात दिल्यावचर आम्ही गांवी नेहुन तिच्यावर अंत्यसंस्कार केले.

३.    आरोपीने गावात  वैष्णवीची बदनामी केली.  त्यामुळे वैष्णवी नाराज होती.   मी झालेल्या प्रकारा बाबत आरोपी विरुध्द पोलिस स्टेशनला रिपोर्ट दिला. त्यातील मजकुर माझ्या सांगण्या प्रमाणे लिहिलेला आहे.  फिर्यादी जबाब मला दाखवला.  तो तोच असुन त्यावर माझी सही आहे.  त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. २६** देण्यात आले.  त्याअधारे प्रथम खबरी अहवाल नोंदवला.  त्यातील मजकुर माझ्या सांगण्या प्रमाणे लिहिलेला आहे.  प्रथम खबरी अहवाल  मला दाखवला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे.  त्यातील मजकुर बरोबर आहे.  त्यास **नि. २७** देण्यात आले.  माझा राधानगरी न्यायालयात जबाब माझ्या सांगण्या प्रमाणे नोंदवला होता.  तो जबाब मला दाखवला.  तो तोच असुन त्यावर माझी सही आहे.  त्यातील मजकुर बरोबर आहे.  त्यास **नि. २८** देण्यात आले.   आरोपी हा माझ्या गावातील रहाणारा असल्यामुळे मी त्याला ओळखतो.  आज रोजी तो न्यायालयात हजर नाही. त्याला दाखवल्यास मी ओळखु शकतो. ( आरोपीचा गैरहजरी माफिचा अर्ज ओळखी बाबत वाद उपस्थीत न करता दिला.  ) पोलिसांनी घटनास्थळचा म्हणजे आमच्या घरातील वैष्णवी झोपलेल्या खोलीचा पंचनामा केला.  ती खोली मी पोलिसांना दाखवली.  पोलिसांनी त्या ठिकाणी ग्रामोझोनची बाटली जप्त केली.  पंचनाम्यावर मी सही केली.  ती मला दाखवली ती तिच आहे.

**नि. ३१ वरील आदेशान्वये उलटतपास तहकुब**

RAJSHRI VIJAY ADONE
Digitally signed by RAJSHRI VIJAY ADONE
Date: 2026.08.07 11:24:42 +0530

दिनांक – २४/०७/२०२६

( श्रीमती आर.  व्ही. आदोने  )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश ,

कोल्हापूर

**शपथेवर आरोपी तर्फे उलटतपास वकिल श्री एस. एस. अंगज**

४. मी इयत्ता १० वी पर्यंत शिकलेलो आहे. मला एकूण ३ मुली होत्या. मयत वैष्णवी हिचे आरोपी शुभम सोबत प्रेम होते हे मला घटनेच्या अगोदर ५ ते ६ महिन्या पुर्वी समजले. मी आरोपीला दिनांक १७.०३.२०२२ रोजी या संदर्भात विचारले व खात्री केली. त्यावेळी माझ्या सोबत अन्य कोणी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०३.२०२२ मी आरोपीला भेटलो, आमच्या दोघांच्यात चर्चा झाली असे खोटे सांगत आहे. आरोपीचा वैष्णवीला फोन आला हे मला वैष्णवीने सांगीतले. त्यावेळी वैष्णवी माझा फोन वापरत होती आणि त्याचा नंबर ९७६७३८२६५६ असा होता. पोलिसांनी माझा फोन जप्त केलेला नाही. मी पोलिसांना त्यावेळचे कॉल डिटेल्स दिलेले नाहीत. घटनेच्या नंतर एक महिन्याने मी फिर्याद दिली. घटने नंतर म्हणजे वैष्णवीच्या मृत्यू नंतर लगेच तक्रार देण्यास मला अडचण नव्हती.

५. मी घटने नंतर सी.पी.आर हॉस्पीटल कोल्हापुर येथे सचिन भिमराव बिद्रेकर यांची गाडी घेवुन गेलो. दिनांक २६.०३.२०२२ रोजी सी.पी.आर हॉस्पीटल मध्ये मी तसेच वैष्णवीने आरोपी शुभम मुळे वैष्णवीने आत्महत्या केली असे सांगीतलेले होते. पोलिसांनी सी.पी.आर हॉस्पीटल मध्ये माझा वेगळा जबाब घेतला नाही. मी सी.पी.आर हॉस्पीटल मध्ये आरोपी विरुध्द जे सांगीतले ती कागदपत्रे दोषारोपपत्रात नाहीत. हे मला माहित नाही की, वैष्णवीच्या मृत्यु नंतर पोलिसांनी अकस्मीत मयत रजि. नं. ३२/२०२२ दाखल केले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, सी.पी.आर हॉस्पीटल मधील डॉक्टर श्री विजय यांनी वैष्णवीच्या मृत्यु नंतर अकस्मीत मृत्यु रजि. नोंद करण्या बाबत पोलिसांना कळविले होते किंवा कसे. वैष्णवीला सी.पी.आर हॉस्पीटल मध्ये दाखल केल्यावर मी आणि माझी पत्नी तिच्या सोबत होतो. दवाखान्यात वैष्णवीचा मृत्यु पुर्वी जबाब पोलिसांनी मध्यरात्री ३.०० वा. नोंदवला

होता.   त्या जबाबावर जबाब माझ्या समक्ष  नोंदवविला या साठी माझी सही घेतली नाही.  तो जबाब नोदवते वेळी डॉक्टर हजर नव्हते.  साक्षीदार स्वतःहुन सागतो की नर्स हजर होत्या.  हे मला माहित नाही की, पोलिसांनी त्या जबाबावर नर्सचे नांव आणि सही घेतली किंवा कसे.   ज्या पोलिसांनी जबाब लिहुन घेतला त्यांचे नांव मला सांगता येणार नाही.  वैष्णवीचा तो जबाब मी वाचलेला नाही.

६.    मारुती हरी रावण हे माझे सासरे आहेत आणि ते मुरगुड ता. कागल येथे राहणारे आहेत.  मारुती यांना दोन मुली आणि एक मुलगा आहेत.  हे म्हणणे खरे नाही की, मारुती यांच्या मुलासाठी मयत वैष्णवी हिची मागणी मारुती यांनी माझ्याकडे केली होती.  हे म्हणणे खरे नाही की, वैष्णवीने मारुतीच्या मुलास लग्नास नकार दिल्यामुळे तो वैष्णवीवर चिडुन होता.  हे म्हणणे खरे नाही की, वैष्णवीच्या मृत्यु नंतर एक महिन्याने माझे तसेच मारुती आणि गावातील भाउबंद यांच्या मध्ये चर्चा होवुन आरोपी शुभम विरुध्द खोटी फिर्याद दिलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, वैष्णवी आणि आरोपीच्या दरम्यान प्रेम होते असे मी खोटे सांगत आहे.  वैष्णवी आणि आरोपी एकमेकांना मोबाईवर मॅसेज पाठवत होते, फोन करत होते या संदर्भात मी कोणताही पुरावा पोलिसांना दिलेला नाही.  हे म्हणणे खरे नाही की, गावामध्ये आरोपी, त्याची आई आणि आजोबा यांची २५ एकर जमिन आहे, त्यांचे राजकीय घराणे आहे याचा विचार करुन आरोपीला व त्याच्या कुटूंबीयांना त्रास देण्यासाठी मी खोटी केस दाखल केलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही

श्रणोत्तरी स्वीकृती

RAJSHRI VIJAY ADONE

Digitally signed by RAJSHRI VIJAY ADONE
Date: 2026.08.07 11:25:45 +0530

दिनांक – ०६/०८/२०२६

( श्रीमती आर.  व्ही. आदोने )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश ,
कोल्हापूर